## (१) सामाजिक मानसशास्त्र

सामाजिक मानसशास्त्र म्हणजे काय ? ते सांगून त्याची व्याप्ती सांगा ?

सामाजिक मानसशास्त्र ही मानसशास्त्रातील महत्वाची शाखा आहे. सामाजिक मानसशास्त्रामध्ये ही जरी प्राचीन असला तरी वैज्ञानिक पद्धतीने या विषयाच्या अभ्यास करण्यासाठी सुरुवात १९ व्या शतकात झाली म्हणून अन्य शाखांनी सामाजिक मानसशास्त्र हे आधुनिक शास्त्र आहे.

आधुनिक युगात सामान्य मानसशास्त्राप्रमाणे व सामाजिक मानसशास्त्रालाही महत्व आहे. यामुळे मानसशास्त्रीय व सामाजिक लक्षण सामाजिक शास्त्राकडे वळले गेले आहे.

व्याख्या :- " व्यक्ती व व्यक्तींच्या संबंधातून सामाजिक जीवन तयार होते. तेव्हा या संबंधाच्या घडण-घडणाच्या प्रभावाच्या प्रकाराचा मानसशास्त्रीय अभ्यास म्हणजे सामाजिक मानसशास्त्र होय."

मानवी वर्तनावर समाज व समाजाचा प्रभाव पडत असतो. तेव्हा सामाजिक व्यक्ती महत्वाचा विकास कसा होतो कसा प्रश्नाचा विचार केला पाहिजे, त्याचप्रमाणे व्यक्तीचे इतर व्यक्तीचे संबंध कसे प्रस्थापित होते. व ते कसे असले पाहिजे व आपल्या वृत्तीत कसा बदल होतो. आपले इतरांशी संबंध कसे असावे इत्यादी समाज जीवनातील मानसशास्त्र प्रश्नाचा विचार सामाजिक मानसशास्त्रात केले जाते. तसेच समाजातील फॅशन, चित्रपट, चित्रवाहिनी इत्यादी विविध घटकांचा आपल्यावर परिणाम होत असतो या घटकांचा अभ्यास करणे आवश्यक आहे, लोकशाही शासन प्रणाली मतदान निवडून लोकमत घडविणे प्रचार करणे इत्यादी आवश्यक असतात. त्या पार्टी आणि उद्योगपती यांनी आपल्या उत्पादनाची जाहीरात करावी लागते. यामुळे काही लोकशाहीतील महत्वाचे प्रश्न सामान्य मानसशास्त्रात सोडवले जाते.

समाज हा व्यक्तींनी बनलेला असतो. सर्व व्यक्तींचे जीवन सुखी असते असे नाही. अनेकांनी

(व्यक्तीच्या जीवनावर समाज ही समस्या निर्माण होते.
उदा :- गुन्हेगारी, बालगुन्हेगारी, घटस्फोट, कौटुंबिक अस्वस्थता, जाती वैमनस्य, राजकीय वैमनस्य
अशा कितीतरी गोष्टी आपले सामाजीक जीवन ढवळून काढत असतात. त्यामुळे आपले जीवन यावरी काही उपाय आहे काय? या प्रश्नांचा अभ्यास या शास्त्रात केला जाते. थोडक्यात असे म्हणता येईल कि व्यक्ती व व्यक्तीच्या सामाजीक जीवन तयार होते, व सामाजीक संबंधाची घडण-घडण प्रभाव प्रकार मानसशास्त्रान अभ्यास म्हणजे मानसशास्त्र होय.

* सामाजीक मानसशास्त्राचे स्वरुप :-

सामाजीक मानसशास्त्राच्या विविध व्याख्याचा विचार केला तर या सर्व व्याख्या मानवाच्या आंतरक्रियात्मक वर्तनाला सामाजीक मानसशास्त्राच्या स्वरुपावर चर्चा करत असताना अत्यंतीक महत्व प्राप्त झालेले आहे. सामाजीक व्यक्तीच्या स्वरुपावर चर्चा करित असताना व्यक्तीच्या या आंतरक्रियात्मक वर्तनाकडे दुर्लक्ष करता येणार नाही. व्यक्ती - व्यक्तीच्या परस्परामध्ये आंतरक्रिया व परस्पर संबंध याचा विचार करणे महत्वाचा आहे.

सामाजीक मानसशास्त्र समजून घेण्यासाठी खालील भागाचा विचार केला जातो.)

① सामाजीक मानसशास्त्र केवळ इतरांच्या सांगण्यावर किंवा एखादया दुसऱ्याच्या अनुभवावर अवलंबून नाही. त्याला निश्चीत असे उद्देश आहे. वैज्ञानीक पद्धतीच्या आधारे कोणत्याही घटकेचे प्रत्यक्ष निरीक्षण करुन मानवाच्या सामाजीक व वैज्ञानीक अभ्यास इतर शास्त्राप्रमाणे सामाजीक शास्त्रामध्ये केला जातो. वैज्ञानीक पद्धतीच्या आधारे कोणत्याही घटकाचे प्रत्यक्ष निरीक्षण करुन मानवाच्या आधारे कोणत्याही मानवाच्या सामाजीक व वैज्ञानीक इतर

सामाजिक व मानसशास्त्रात केला जातो. म्हणून त्यामुळे सामाजीक मानसशास्त्र हे शास्त्राच्या पद्धतीवर अवलंबून असे. लोकांच्या स्वभावात बद्दल व सामाजीक व्यवहारात बद्दल अनुभवाने आपण मनात काही शंका बाळगतो व अंदाज व्यक्त करतो त्याच्या आधारावर इतरांना आपण बरोबर और समजतो व अनुसंधानाने, पूर्वग्रहांच्या तिरस्काराने वागतो या सर्व गोष्टी टाळण्यासाठी मानसशास्त्रीय पद्धतीने अभ्यास करणे आवश्यक आहे.

② मौलिक शाखा :-

कोणत्याही शाखेचा अभ्यास करत असताना प्रत्यक्षात आपल्याला इतर शाखेवर अवलंबून असते. सामाजिक मानसशास्त्रात संशोधन करत असताना प्रत्येकवेळी आपणास इतर शाखेवर अवलंबून असते. सामाजीक मानसशास्त्रात संशोधन करत असताना अथवा प्रत्येकवेळी आपण इतर प्रयोग करतो.

उदा :- राज्यशास्त्र, भूगोल इत्यादी शाखांशी आपण संबंध स्थापित करतो. यात नवीन रसायन आहेत त्या रसायनाचा अभ्यास म्हणजे मानसशास्त्र होय.

③ व्यवहार विषय शास्त्र :-

व्यवहार हा प्रत्येक व्यक्तीच्या जिव्हाळ्याचा विषय असतो. इतर शास्त्राच्या तुलनेत हे शास्त्र सामाजिक वर्तनाचा अभ्यास करते. या शास्त्रामुळे ज्ञान हे फक्त ज्ञानात भर घालण्यासाठी असते. तर आपले सामाजीक प्रश्न सोडवण्यासाठी सूचक व मार्गदर्शन असते.

उदा :- लहान मुलांच्या व्यक्तीमत्वाचा विकास करा करावा? वेगवेगळ्या नियमाने निर्माण शाळेच्या नाव नोंद कसे कमी करावे, इत्यादी बाबतीत मार्गदर्शनाचे जबाबदारी मानसशास्त्रात केली जाते. सामाजीक मानसशास्त्र इतके व्यवहारी होय.

(७) व्यक्ती व व्यक्ती मध्ये प्रस्थापित क्रिया व्यक्ती व व्यक्ती :
मध्ये आंतरक्रिया आंतर व्यक्ती संबंध या नावाने ओळखले
जाते. या आंतरक्रिया दोन किंवा अधिक क्रियातून निर्माण
होणारे सामाजीक संबंध प्रत्येक स्वरुपाचे असते त्यामध्ये
एक प्रकारची घनीष्ठ व जिव्हाळा असतो व त्यामध्ये प्रेम
असू शकते. सर्वसाधारण कुटुंबाचे व सामाजीक संबंध हेच
निराळे संबंध आंतरिक स्वरुपाचे असतो. या संबंधामध्ये
व्यक्ती व व्यक्तीच्या वर्तनावर परिणाम होतो याचा अभ्यास
सामाजीक मानसशास्त्रात केला जातो ही एक सामाजीक
मानसशास्त्राचे अंग आहे.

(५) व्यक्ती व गटातील आंतरक्रियेच्या अभ्यास एका व्यक्तीच्या
विविध गटाशी प्रस्थापित आंतरक्रिया व त्यातून निर्माण होणारे
सामाजीक संबंध यांचा समावेश होतो. हॅरी जॉन सन या
अमेरिकेच्या समाजशास्त्रज्ञाने असे प्रतिपादन केले आहे कि
व्यक्ती आपले बहुसंख्य विविध गट
विविध प्रकारच्या गरजेसाठी प्राथमिक संबंध आंतरक्रियेच्या
माध्यमाद्वारे प्रस्थापित करावे लागते. या प्रकारच्या
संबंध व्यक्ती सर्व साधारणतः [illegible] व प्रतिष्ठेने
ओळखली जाते. या प्रकाराच्या आंतरक्रियेतून निर्माण
होणारे सामाजीक संबंध हे आपले सहकार्याचे व आणि
विचार पूर्ततेवर आधारलेली असतात. अशी प्रकारच्या
संबंधात व्यक्ती जी भुमिका बजावतो त्या पाठी मागे
व्यक्तीची काही अपेक्षा आहे.

★ हॅरी जॉन सन :- या अमेरिकेच्या समाजशास्त्रज्ञाने असे
प्रतिपादन केले आहे की व्यक्ती आपले बहुसंख्य आयुष्य
विविध गट व [illegible] यातच व्यतीत करते व्यक्तीच्या
विविध प्रकारच्या गरजेच्या पूर्ततेसाठी व्यक्तीला विविध
गटासाठी सामाजीक संबंध आंतरक्रियेच्या माध्यमाद्वारे

प्रस्थापित करावे लागतात. या प्रकारच्या संबंधात व्यक्ती सर्वसाधारणतः विचारात घेत नसतात व प्रतिक्रिया ओळखली जात या प्रकारच्या आंतरक्रियेतून निर्माण होणारे सामाजिक संबंध हे औपचारिक स्वरूपाचे आणि विचारपूर्वकतेवर आधारलेले असतात. अशा प्रकारच्या संबंधात व्यक्ती जी भूमिका बजावते त्या पाठी- -मागे व्यक्तीच्या काही अपेक्षा आहेत.

(६) गटागटातील संबंध :-

व्यक्ती व व्यक्तीतील संबंध महत्त्वाचे असतात. ज्यावेळी दोन गटागटातील जर दोन समुहाचे अभ्यास करायचे असेल तर त्याचा अभ्यास सामाजिक अभ्यासक्रमाने केला जातो. त्यावेळी दोन गट एकमेकांसमोर उभे राहतील एकमेकांशी देवाण-घेवाण होते त्या वर्तनाचा अभ्यास सामाजिक मानसशास्त्रात केला जातो.

(७) सामाजिक वर्तनाचा अभ्यास व्यक्तीचे वर्तन व सामाजिक वर्तन या दोन भिन्न संकल्पना आहेत. मानवी वर्तन केवळ दृश्य स्वरूपाचे हालचाली मे नव्हे म्हणजे ज्या व्यक्तीची जी हालचाल व व्यक्तीच्या प्रत्यक्ष दर्शनाने दिसणारी प्रतिमा तर एवढेच नव्हे तर खेळणे, वाचणे, झोपणे हे वर्तन होय त्याचप्रमाणे चिंतन व मनाची कल्पना दिवा स्वप्नात समाविष्ट जाते हे वर्तन आंतरिक स्वरूपाचे आहे. सामाजिक मानसशास्त्र बाह्य व आंतरिक व अशा दोन्ही वर्तनांचा अभ्यास मानस- -शास्त्रात केला जाते.

उदा :- एखाद्या भुकेल्या व्यक्ती समोर जेवण ठेवल्यावर व्यक्ती कोणताही विचार न करता हे व्यक्तीचे वर्तन हे सामाजिक वर्तन नव्हे तेथे कोणतेही सामाजिक प्रसंग नाही तेथे जेवण व भुकेलेली व्यक्ती आहे. या विरुद्ध

उदा :- एखाद्या समारंभाशी जाणारी व्यक्ती हे सामाजिक प्रसंग होय. अशा सामाजिक वर्तनाचा अभ्यास सामाजिक मानसशास्त्राचे अभ्यासक करतात.

★ सामाजिक मानसशास्त्राची व्यक्ती व्याप्ती वरील मानस-शास्त्राच्या स्वरूपावरून सामाजिक मानसशास्त्राची व्याप्ती किती आहे हे लक्षात येते. सामाजिक मानसशास्त्रात व्यक्ती पासून ते समूह, राष्ट्र, धर्म, जग इत्यादी मोठ्या समूहाचा अभ्यास केला जातो व या अभ्यासात आर्थिक सामाजिक व धार्मिक, वैज्ञानिक, शैक्षणिक, वाङ्मय इत्यादी घटकांचा समावेश होतो.

सामाजिक मानसशास्त्रामध्ये अनेक प्रकारचे गट, समूह तसेच व्यक्तींचे सामाजिक वर्तन या सर्वांचा विचार केला जातो. समाजामध्ये व्यक्तीचे वर्तन व सामाजिक संबंध यांचा सुद्धा अभ्यास केला जातो. समाजातील अनेक व्यक्ती भौतिक सुख प्राप्त झालेले असताना सुद्धा असमाधानी असतात असे का? या प्रश्नाचे उत्तर देण्याचे कार्य सामाजिक मानसशास्त्र करते. व्यक्तीच्या वर्तनाला अनेक बाजू असतात. व्यक्ती विशिष्ट प्रकारे वर्तन का करते याचेही अभ्यास याच शास्त्रात केला जातो. म्हणून सामाजिक मानसशास्त्राची व्याप्ती ही जरी व्यापक असली तरी त्याला दैनंदिन जीवनात अन्य साधारण असते.

① वर्तन प्रेरणा :-

व्यक्ती जन्मापासून ते मरेपर्यंत आपले जीवन व्यतीत करीत असते. व्यक्तीचे जीवन समजून घ्यायचे असेल तर काही प्रेरक व घटक लक्षात घ्यावे लागतात. व्यक्तीच्या वर्तनाचे स्वरूप समजून घेण्यासाठी व्यक्ती मुळाशी असलेल्या प्रेरणा ही समजावून घ्यावी लागते. व्यक्तीच्या वर्तनाशी जैविक प्रेरणा, मानसिक प्रेरणा, सहवास प्रेरणा, वैयक्तिक प्रेरणा निगडीत असतात. या प्रेरणा आधारलेले असतात म्हणूनच सांस्कृतिक स्वभावामुळे विशिष्ट स्वरूप प्राप्त होते. प्रेरणा ही महत्त्वावर नियंत्रण ठेवणारा घटक असल्यामुळे विविध प्रेरणांचा अभ्यास सामाजिक मानसशास्त्रात केला जातो.

(२) व्यक्तीचे सामाजिक वाढ, सांस्कृतिक वाढ जडण-घडण

लहान मूल जन्मले तेव्हा कोरामातीचा गोळा असतो. ज्याप्रमाणे एखादा कुंभार मातीच्या गोळ्यास चाकावर ठेवून वेगवेगळे आकार देतो तसेच मानव सुद्धा आपल्या समाज करण्यामुळे विकसीत होते व नंतर त्या मुलाच्या वर्तनावर नियंत्रण ठेवून योग्य दिशा देण्याचे काम संस्कृति करत असते. म्हणजे व्यक्तीच्या व्यक्तीमत्व जडण-घडण सामाजिक वाढ व संस्कृती करण या दोन प्रक्रिया महत्वाचे असतात.

(३) अभिवृत्ती :-

व्यक्तीच्या वर्तनाला आकार देण्यासाठी वरिल तीन घटक कारणीभूत ठरतात. व्यक्तीची आवड, अभिरुची व अभिवृत्ती ही काही आहे, याचा विचार सामाजिक मानसशास्त्रात केला जातो. अभिवृत्ती म्हणजे काय? याचे प्रकार किती? याचा प्रभाव किती प्रमाणात आहे. याचा प्रभाव अभ्यास सामाजिक मानसशास्त्रात केला जातो. लोकशाही शासन प्रणालीमध्ये लोकमत व प्रचार याना फार महत्वाचे स्थान आहे. व्यक्तीच्या जडण-घडणामध्ये लोक मताचा काय परिणाम होतो. प्रचार तंत्रामुळे व्यक्तीच्या वर्तनामध्ये फरक पडतो का? प्रचाराची साधने कोणती? प्रचाराची तंत्र कोणती या सर्वांचा अभ्यास सामाजिक मानसशास्त्रात केला जातो.

(४) संमोहन :-

संमोहन व संमोहनाचा वापराल व्यक्ती कोणत्या न कोणत्या समूहाचा सहभागी असतो. प्रत्येकास कोणत्या तरी दबावाखाली झालेला असतो. प्रत्येक जण आपल्या इच्छेनुसार आपल्या वर्तनाचा मार्ग निवडत असतो म्हणून असे वर्तन हे परिस्थितीनुसार ठरवावे लागते. संमोहन वर्तन करत असताना प्रत्येक पाऊल विचारपूर्वक उचलावे लागते.

एखाद्या व्यक्ती वेगवेगळ्या ठिकाणी वर्तन का करतो. याचा अभ्यास सामाजिक मानसशास्त्रात केला जातो.

उदा :- एखाद्या व्यक्ती ऑफिसमध्ये, मित्रांसोबत, घरात वेगवेगळे वर्तन करतो कारण प्रत्येक ठिकाणची परिस्थितीही वेगवेगळी असते. प्रत्येक संमोहन हे गतिमान असतो पण त्यातील काही संमोहन चिरकाळ ह टिकणार असतात.

(5) सामाजिक विकृती व आणि समस्या :-

सामाजिक मानसशास्त्र हे व्यवहार अत्यंत उपयोगी शास्त्र आहे. समाजामध्ये ज्या काही सार्वजनिक स्वरूपाच्या विकृतीक व समस्या निर्माण होतात, त्या समस्या सामाजिक मानसशास्त्रास आव्हान देत असतात. अशा समस्यांना वेळीच आवर घालणे आवश्यक असते व प्रक्रिया त्यांचे अस्तित्व हे मानवी व्यवहाराशी कसे संबंधित आहे. याचा विचार सामाजिक मानसशास्त्रात केला जातो.

★ सामामाजिक बदल व प्रगती :-

बदल हा समाजाचा व निसर्गाचा विभाज्य घटक आहे. प्रत्येक वस्तूमध्ये व व्यक्तीमध्ये कोणत्या न कोणत्या कारणामुळे सारखे परिवर्तन होतो त्यामुळे करणामध्ये बदल होतो तेव्हा त्याचा परिणाम समाजामध्ये राहणाऱ्या घटकांशी संबंधीत असतो. अशा बदलाला अनुरूप म्हणून वृत्ती स्थिर होत असते.

उदा :- शिक्षणाचे वाढते प्रमाण स्त्रियांचे विविध क्षेत्रात असलेले होत असते. आधीवाची समाजात होत असलेली प्रगती हे समाजामध्ये व सुरक्षीतपणे आधुनिक समाज घडण्यास कारणीभूत ठरतात. त्यातूनच समाजाचे चारित्र्य घडत असते. म्हणूनच अशा बदलांना, सामाजिक मानसीकता निर्माण झाली पाहिजे आणि दिवसेंदिवस स्थित्यंतरे काही होतात याचा अभ्यास सामाजिक मानसशास्त्रात केला जातो.

सामाजीक उद्देपीक :-

व्यक्तीच्या वर्तनाचा शोध घेत असताना प्रत्येक वर्तनामागे कोणते-कोणते कारण असते, कारण म्हणजे उद्देपीक होय. उद्देपीकाला अनुसरून व्यक्ती उद्देपीक व्यक्ती कोणता विचार केला. भावना व कल्पना कशा घडविल्या जाते ? सामाजीक मानसशास्त्रात केला जातो.

उदा :- तिरंगी झेंड्याचे आकृती.

सामाजीक वर्तन :-

सामाजीक वर्तनाचा विचार करत असताना या वर्तनामध्ये अनेक वर्तनाचा प्रभाव असतो. (मित्र व नातेवाईक) काळे व गोरे यांच्यातील संबंध परस्पराविषयी वाटणारा द्वेष, मत्सर, घृणा, यासारखे अनेक घटक त्यामध्ये सहभागी असतात. म्हणून अशा वर्तनाचा अभ्यास करण्यासाठी व सामाजीक संबंध टिकविण्या करण्यासाठी या सर्वांचा अभ्यास सामाजीक मानसशास्त्रात केला जातो.

जन मताचा अभ्यास :-

समाजामध्ये घडणाऱ्या घटनेची किंवा घडामोडी विषयी सर्वांचे एकमत असते. समाजामध्ये बहुसंख्य लोकांचे जे मत प्रमाण मानले जाते.

उदा :- निवडणुकीत किंवा राज्यपातळीवर एखाद्या विशिष्ट पक्षाला बहुमत मिळाले असेल तर ते अंतिम प्रमाण मानले जाते. एखाद्या विशिष्ट राजकीय पक्षाला जनमताचा कौल का मिळतो ? याचा सामाजीक दृष्टिने अभ्यास सामाजीक मानसशास्त्रात केला जातो.

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संबंध :-

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय

पातळीवर जे बदल होतात त्या बदलांशी स्विकार करण्या-
-साठी दिवसेंदिवस अनुकूल जनमत तयार होते, आणि
त्या बदलांचा स्विकार केला जातो. जागतिक घडामोडींचा
परिणाम काही काळानंतर सर्वांवर पडत असतो.

उदा :- आधुनिकीकरणाचा परिणाम दिवसेंदिवस
लोकमतावर पडलेला असलेला दिसून येतो. या
सर्वांच्या परिणामावर शत्रू व शत्रूसंबंध कसे दृढ होतील
याचा सामाजिक मानसशास्त्रात केला जातो.

Paper II

II Semester [ मानसशास्त्र - psychology - II ] १०, २, २०१२

(1)

## (१) नेतृत्व [ Leadership ]

[ बर्न :- या सुप्रसिद्ध मानसशास्त्रज्ञाने १९५० मध्ये नेत्यांच्या मनाचा सविस्तर अभ्यास करून यशस्वी नेत्या मध्ये खालील गुणांचा समावेश असला पाहिजे असे प्रतिपादन करण्यात आले.

① महत्त्वकांक्षा ② बुद्धीमत्ता ③ परिपक्वता
④ विश्वास नियता ⑤ स्थिरता ⑥ कार्य करण्याची क्षमता ]

[ नेत्यांच्या गुणा संबंधी वेगवेगळ्या विचार वंतांनी नेत्यांच्या वेगवेगळ्या गुणांची चर्चा केलेली आहे. या सर्वांच्या विचारांच्या आधारे आपल्याला नेत्यांच्या अंगी खालील गुण असतो पाहिजे असे प्रतिपादन करता येईल. ज्या व्यक्ति मध्ये खालील गुण आढळतील तीच व्यक्ती यशस्वी नेता होऊ शकतो.

[ ① बुद्धीमत्ता ② संकल्प शक्ती ③ सामाजिकता
④ आत्मविश्वास ⑤ परिश्रमशीलता ⑥ कल्पना शक्ती ]
⑦ परिवर्तनशीलता ⑧ दुरदृष्टी ⑨ उद्योजकता ⑩ सत्यप्रियता
⑪ पावित्र्यता ⑫ भाषण शैली ⑬ निर्भिडपणा ⑭ सर्व-गुणसंपन्नता ⑮ शारीरिक गुण ]

* (1) शारीरिक गुण :- [ नेतृत्वासाठी व्यक्तीचे आंतरिक व बाह्य व्यक्तिमत्व प्रभावित असावे लागते. सुंदर, स्वास्थ्य व मजबूत शरीर असणे आवश्यक असते. यामुळे सुदृढता नेतृत्वासाठी आवश्यक असते ] जर शारिरिक अवस्था प्रभावित असेल तर इतर व्यक्तींवर त्याची छाप पडते.

उदा :- नेल्सन मंडेला आफ्रिकेचा माजी राष्ट्र अध्यक्ष दिसण्यास कुरूप असेल तरी ते यशस्वी नेता म्हणून मान्यता पावली आहेत त्यांच्याकडे नेतृत्वासाठी ]

आवश्यक असलेले सुदृढ शरीर आकर्षक व्यक्तिमहत्त्व व (7)
बुद्धीमत्ता त्यांच्या जवळ होती म्हणून ते लोकप्रिय नेता होऊ शकले.

*[2] बुद्धीमत्ता :- [ नेतृत्वासाठी विलक्षण बुद्धीमत्तेची गरज असते नेत्याची बुद्धी ही त्यांच्या अनुयायी पेक्षा कुशाग्र कल्पक त्याच बरोबर व्यापक असावी. लागते. कुशाग्र बुद्धीमत्तेमुळे नेत्याला त्या-त्या समाजाच्या समस्येचे व्यवस्थीत आकलन होऊ शकते. बुद्धीमत्तेमुळे नेता जटील समस्या सहजपणे सोडवू शकतो. त्यामुळे नेत्याच्या अंगी 'बुद्धीमत्ता' असणे ही आवश्यक गुण आहे.

*(3) आत्मविश्वास :- [ नेतृत्वासाठी सर्वात आवश्यक व महत्त्वाचे (8)
गुण म्हणजे आत्मविश्वास होय.) याशिवाय कोणत्या व्यक्तिला नेतृत्व करता येत नाही.) नेत्यातील आत्मविश्वासामुळे त्याला अचूक निर्णय घेता येईल त्याच बरोबर आत्मविश्वासामुळे नेता आपल्या संकल्पावर दृढ राहू शकतो. या आत्मविश्वासामुळे तो आपला संकल्प आणि ध्येय मूर्त स्वरूपात आणू शकतो. जर नेत्याच्या अंगी आत्मविश्वास नसेल तर निव्वळ बुद्धीमत्ता असलेला नेता यशस्वी होऊ (9)
शकत नाही.

*(4) संकल्पशक्ती :- [ नेतृत्वासाठी संकल्पशक्ति ही गुण असणे आवश्यक आहे. कारण संकल्पशक्ती किंवा इच्छा शक्ती या शिवाय नेता कोणतेही कार्य करू शकत नाही. जर नेत्याकडे संकल्पशक्ति असेल तर कोणत्याही प्रतिकूल परीस्थीतील विचलीत न होता त्यावर मात करू शकतो. त्याच्या शक्ती व संकल्प मुळे तो आपल्या अनुयायांचा आदर करू शकतो.

5] सामाजीकता :- [ ही गुण नेत्याच्या अंगी असणारा सर्वात महत्त्वाचा गुण आहे.) नेत्याच्या अंगी सामाजीकता हा गुण असणे आवश्यक आहे. ज्यांच्याकडे हा गुण नाही. ती व्यक्ती नेता बनू शकत नाही. कारण (सामाजिकतेमुळे तो अनुयायी सह व समाजात मिसळू शकतो. सामाजिकतेमुळे त्यांच्यात व समाजात आपले पणाची भावना

हे परिवर्तनामुळे नेत्याला शक्य होते.

(९) दूर दृष्टी :- नेत्यास दूर दृष्टीमुळे भविष्यकाळात घडू अंदाज घेता येतो. भविष्यात काय होईल? कोणती परिस्थिती आपल्याला अनुकूल असेल याचा वेध नेत्यास अगोदर घेता आला पाहिजे आणि हे वेध घेण्याचे कार्य दूर दृष्टीमुळे नेत्याला करता येते. विविध क्षेत्रातील यश - अपयश आणि वास्तव तसेच भविष्या विषयाचे नियोजन त्या नेत्यास करता येते.

उदा :- छत्रपती शिवाजी महाराज, सरदार वल्लभभाई पटेल, महात्मा - गांधी यांच्याकडे दूरदृष्टी असल्यामुळे भविष्यात येणाऱ्या संकटावर मात करू शकले.

(१०) उद्देपिकता :- हा नेत्याच्या महत्वाचा व आवश्यक गुण आहे या गुणात अनेक गुणांचा समावेश होत असतो. स्फूर्ती, तत्परता, स्पष्टता मौलिकता आदी गुणांचा समावेश यात होतो. याचा अर्थ नेता हा इतरांना स्फूर्ती देणारा असला पाहिजे. नेत्याचे विचार स्पष्ट असले पाहिजे. तसेच तो उत्साही व प्रसन्न असले पाहिजे. कोणतेही काम तत्परतेने करण्याची त्यांची मनोवृत्ती असली पाहिजे त्याचेच कार्य हे श्रेष्ठ असले पाहिजे.

(११) भाषण कौशल्य :- कोणत्याही क्षेत्रातील यशस्वी नेता होण्यासाठी त्यांच्याकडे उच्च प्रतिचे भाषण कौशल्य असले पाहिजे. त्याला प्रभावीकारी भाषण देता आले पाहिजे कारण तो भाषणाच्या माध्यमातून जनसमुदायाला प्रभावीत करू शकतो त्यांच्या प्रमाणे तो जन समुदायाचे नियंत्रण करू शकतो. एवढेच नव्हे तर प्रभावी भाषणाने इतर लोकांना आपले मानवाई करू शकतो. भाषण कौशल्यामुळे नेता आपले विचार व कार्य इतरांना पटवून देऊ शकतो. एवढेच नव्हे तर या भाषणामुळे स्वतःच्या लहान - सहान चुकावर पांघरूण घालू शकतो. त्यामुळे नेत्याच्या अंगी हे कौशल्य असणे आवश्यक आहे.

निर्माण होते. परस्पारिक संबंध प्रस्थापित होतात. सामाजिक-
तेमुळे नेत्याला समाजाचे आणि अनुयायांचे पाठबळ व पाठिंबा (१२)
मिळत असतो. म्हणून सामाजिकता हा गुण नेत्यासाठी
आवश्यक आहे.

⑥ परिश्रम शिलता :- नेत्यामध्ये हा गुण असला पाहिजे.
पाहिजे ते परिश्रम केल्या-
शिवाय कोणालाही नेता होता येत नाही. नेतृत्व हे सहजा-
सहजी मिळत नाही. त्यासाठी नेत्याला समाजाच्या व लोकांच्या
हितासाठी आहोरात्र कष्ट करावे लागतात. त्यांना समाजाच्या
अडचणी समजून घेऊन त्या सोडवण्यासाठी रात्रंदिवस
कष्ट करावे लागते. कष्टाळूपणा किंवा परिश्रम हा गुण (१५)
नेत्याच्या अंगी असणे आवश्यक आहे.

⑦ कल्पनाशक्ती :- नेतृत्वासाठी तिव्र बुद्धीमत्तेप्रमाणे
कल्पनाशक्ती असणे आवश्यक आहे.
नेत्याकडे केवळ बुद्धीमत्ता असून चालत नाही तर त्यांच्याकडे
कल्पनाशक्ती ही असावी लागते. कल्पना शक्तीमुळे नेत्याला
देशाची व भविष्यातील कशी स्थिती असेल? भविष्यात
कोणकोणते प्रश्न निर्माण होणार आहेत. त्याचा अंदाज
नेत्याला येऊ शकतो. त्यामुळे आवश्यक त्या उपाय योजना
करणे गरजेचे होते. म्हणून नेत्याकडे या गुणाची आवश्यकता
असते.

⑧ परिवर्तन शिलता :- नेतृत्वासाठी लवचीकता व परिवर्तन-
शिलता हा आवश्यक गुण आहे तर
एखादा व्यक्ती हट्टी व आग्रही एकांगी मताचा असेल तर
ते व्यक्ती नेतृत्व करू शकत नाही. समाज हा परिवर्तनशील
असतो. समाजात वेगवेगळ्या मताचे व्यक्ती असतात.
यामुळे नेता हा परिवर्तनशील असला पाहिजे. नेत्यांनी
देशातील व समाजातील बदलत्या परिस्थीती नुसार आणि
गरजेनुसार आपल्या कार्यक्रमात परिवर्तन केले पाहिजे. व
बदल केले पाहिजे. परिवर्तन केल्याशिवाय नेत्याला कोणत्या-
ही प्रकारे परिवर्तन करता येत नाही. समाजातील काही
बाह्य ठरलेल्या मुल्यांना मोड घाली देणे व नविन मुल्य रुजवणे

(12) सत्यप्रियता :- यशस्वी व चांगला नेता होण्यासाठी त्यांच्या जवळ सत्यनिष्ठ असणे आवश्यक आहे त्याला निष्ठा असावी लागते. त्यामुळे नेता अनुयायींचा व सत्य विषयी आदर असला पाहिजे त्याला सत्यावर अतल निष्ठा असावी लागते. त्यामुळे नेता अनुयायीचा व समाजाचा आदर्श होतो. जर नेत्याजवळ सत्यप्रियता असेल तर त्या समाजामध्ये सत्याची प्रतिष्ठापणा करणे शक्य होते.

उदा :- महात्मा गांधीने सत्यनिष्ठमुळे भारताच्या स्वतंत्र लढ्याचे यशस्वी नेतृत्व केले.

(13) निगरगट्टपणा :- नेता म्हणजे अशी व्यक्ती की ज्या व्यक्तीला चांगले आणि वाईट असे दोन्ही गुणांच्या व्यक्तीचे नेतृत्व करावे लागते. नेता कोणत्याही समाजातील कार्य पार पाडत असताना एक गट त्याची अहिता प्रशंसा करतो तर दुसरा गट त्याची बदनामी करतो. या बदनामीमुळे किंवा प्रशंसेमुळे त्या नेत्याने हुरळून — न जाता निगरगट्टपणाने दोन्हीचा स्विकार केला पाहिजे नैतिक आचरण आपल्याकडून कोणतीही चूक होणार नाही याची त्याने काळजी घेतली पाहिजे जर आपल्याकडून अनैतिक कृती घडली तर त्याचा समाजावर किंवा आपल्या नेतृत्वावर परिणाम होतो. म्हणून नेत्याने निगरगट्टपणा व प्रशंसा व अपमान दोन्ही सहन केले पाहिजे.

(14) ज्ञानसंपन्नता :- नेत्याला नेतृत्व करण्यासाठी त्याला समाज व्यतिरिक्त इतर ज्ञान असणे आवश्यक आहे. इतर क्षेत्रातील ज्ञान असेल तर त्या ज्ञानाचा उपयोग आपल्या समाजाची सुधारणा करण्यासाठीही होऊ शकतो जर वेगवेगळ्या क्षेत्रातील ज्ञानामुळे जगातील कोणतीही समस्या चटकन सोडवली जाते. म्हणून नेत्याचे व्यक्तिमत्त्व हे समग्रज्ञान संपन्न असावे लागते.

(15) विनोदी बुद्धी :- वरिल विवेचना करून हे स्पष्ट होते, की ती कोणत्याही व्यक्तिला नेता होण्यासाठी व या गुणांची आवश्यकता असते. ज्या व्यक्तीला वरील सर्व गुण असतात तीच व्यक्ती यशस्वी होऊ शकते जर

वरील गुणांचे अभाव नसेल तर ती व्यक्ती नेता होऊ शकत नाही.

प्रश्न :-

नेता म्हणजे काय ? सांगून त्याचे कार्य स्पष्ट करा ?

प्रस्तावना :- प्रत्येक मानवी समाज हा अनेक छोट्या मोठ्या सामाजिक समूहाचा बनलेला असतो. समाजातील हे विविध छोटे - मोठे समूह समाजातील अनेक विविध गरजांच्या पूर्ततेसाठी निर्माण झालेल्या असतात व्यक्ती-च्या विविध गरजा पूर्ण करण्यासाठी छोट्या - मोठ्या समूहांना विविध सामाजिक कार्य पार पाडावे लागतात. या विविध समूहात प्रस्थापित होणाऱ्या आंतरक्रियेत वर्चस्व व निष्ठा या सहज प्रवृत्तीचा समावेश असतो असे जेस्पोर या सामाजिक मानसशास्त्रज्ञाचे म्हणणे आहे. त्याने अनेक पशु - पक्ष्यांच्या वर्तनाचा निरीक्षण केल्यानंतर आपले मत प्रतिपादन केले आहे. मानवी समाजात पण या पेक्षा वेगळी परिस्थिती नाही वर्चस्वामुळे एखादी व्यक्ती - व्यक्तीचा समूह व्यक्तीवर व इतर समूहावर वर्चस्व गाजवतो. व इतर व्यक्ती व समूह निष्ठा स्विकारून ही वर्चस्व मान्य करतात दुसऱ्या शब्दात त्या व्यक्ती व ते समूह त्याचे अनुयायीत्व स्विकार-तात यातूनच नेत्याचा जन्म होतो. समूहात वर्चस्व व निष्ठेचे अनेक उदाहरण देता येतील.

उदा :- कुटुंबात कुटुंब प्रमुखाची कुटुंबातील इतर व्यक्तीवर वर्चस्व असते, शिक्षकाचे विद्यार्थ्यांवर वर्चस्व असते. एखाद्या प्रशासकिय कार्यालयात, कार्यालयीन अधिक्षकाचे कार्यालयातील कारकुनावर वर्चस्व असते, एखाद्या खेळाच्या संघात कर्णधाराचे इतर खेळाडूवर वर्चस्व असते धर्म संस्थान ~~[illegible]~~ गुरुचे आपल्या शिष्यावर वर्चस्व असते इत्यादी

यावरील सर्व उदाहरणावरून नेता केवळ राजकीय क्षेत्रात जसा समजला जात असतो, असे नसल्याचे दिसून येते. नेता हे सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, आर्थिक, कलात्मक

वैज्ञानिक अनेक क्षेत्रात असलेल्यांना असतात व आपआपल्या क्षेत्रात ते इतरांवर वर्चस्व गाजवत असतात. परंतु या ठिकाणी हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे कि एक जीवन क्षेत्रातील नेता हा दुसऱ्या जीवन क्षेत्रात तो नेता ठेव नसतो, आपआपल्या क्षेत्रात व इतरांवर

परंतु या ठिकाणी हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे की एका जीवन क्षेत्रात नेता असतोच असे नाही. हेच जर खरे असले तरी वर्चस्वाच्या संबंधात बोलायचे झाल्यास राजकीय नेत्याचे वर्चस्व हे सर्व- मानव सर्वसामावेशक असते. संपूर्ण समाजावर सत्ता गाजवण्याचे अधिकार व हक्क राजकीय नेत्याला प्राप्त झालेले असल्यामुळे इतर कोणत्याही नेत्यापेक्षा राजकीय क्षेत्रातील नेता आपल्या अनुयायांवर अधिक प्रमाणात वर्चस्व करू शकतो.

* नेत्याची व्याख्या :- करणे ही गोष्ट फारच अवघड आहे

वास्तविक आपण आपल्या दैनंदीन जीवनात नेता नेतृत्व हे शब्द नेहमीच वापरत असतो, परंतु सैद्धांतिक दृष्टीने नेत्याची व्याख्या करणे सोपे काम नाही

① मॉरवीन इशौ :- यांनी नेता हा समुहाचा असा सभासद असतो की जो इतरांवर अधिक प्रमाणात इतरांच्या त्याच्यावर पडणाऱ्या प्रभावापेक्षा प्रत्यक्ष प्रभाव गाजवितो

Mervin . E . show

Leader is the group Member, who, exerts more positive influence over others than they exert over him'.

या ठिकाणी प्रत्यक्ष प्रभाव या शब्दाचे अधिक स्पष्टीकरण करताना शॉ म्हणतात की या प्रभावाची दिशा ही नेत्याकडून आपल्या नेत्याच्या मर्जी-प्रमाणे कार्य करावे लागते. नेतृत्व हे लोक संमत व लोक स्विकृत असते. त्याला लोक मानतात. आदेश समजतात व त्याचे आदेश लोक स्वखुशीने स्विकारतात. तोच आदर्श नेता होऊ शकतो.

* प्रा. मुझाफर शेरीफ व श्री. इवलिन शेरीफ :-

समुहाच्या दर्जा संरचनेत सर्वोच्च दर्जा प्राप्त करणारी व्यक्ती म्हणजे नेता होय.

जेव्हा व्यक्ती एखाद्या समुहाचे नेतृत्व करेल. तेव्हा त्या व्यक्तीच्या इच्छा न कळतच त्या व्यक्तीला त्या गटातील दर्जा दिला जातो या उच्च दर्जाच्या अनुसरून नेत्याला काही कार्ये आपली कर्तव्ये पार पाडावी लागतात.

(3) लापीयर आणि फार्न्सवर्थ :-

ज्या वर्तनाचा इतर लोकांच्या वर्तनावर बराच परिणाम होतो, परंतु ज्या वर्तनावर इतरांच्या वर्तनाचा तितकासा परिणाम होत नाही असे वर्तन म्हणजे नेतृत्व होय.

* नेत्याचे कार्य ( Functions of Leader )

नेत्याचे नेतृत्व हे जसे त्याच्या गुणांशी निगडीत करण्यात आले आहे. तसेच ते नेत्याच्या कार्याशी पण निगडीत करण्यात असल्याने म्हटले जाते. या उलट काही शास्त्रज्ञ तर असे प्रतिपादन करतात की नेत्याचे नेतृत्व अवलंबून असते. नेतृत्वाची ही भूमिका साधी नसते. या भूमिकेत अनेक कार्यांचा समावेश केलेला असतो. नेत्याच्या कार्यात विविधता असते व कोणत्या प्रकारचे कार्य नेत्याने पार पाडावे हे तो ज्या समुहाचा नेतृत्व करतो. त्या समुहातील लोकांच्या व्यक्तीमहत्त्वाला धारा त्या विशिष्ट वेळेचा प्रसंग इत्यादी गोष्टीवर अवलंबून असते. नेत्याचे काही कार्य हे सार्वत्रिक स्वरूपाचे असतात. तर नेत्याचे कार्य खालील प्रमाणे आहेत.

* समाजात नेत्याच्या कार्याला व नेत्याला फार महत्त्वाचे स्थान आहे. कारण नेता हा समाजातील मुख्य किंवा केंद्रीय व्यक्ती असतो. नेता हा त्या समाजात एक शक्ती असतो. समाज त्या नेत्यावर प्रेम करित असतो. त्याच्यावर विश्वास टाकतो. त्यामुळे नेता हा त्या समाजाच...

आदर्श असतो . म्हणून त्या समाजाची प्रगती व अधोगती त्या नेत्यावर अवलंबून राहते. जर त्या नेत्याचे कार्य चांगले असेल तर त्या समाजाचीच प्रगती होऊ शकते. म्हणून कोणत्याही समाजाची व देशाची प्रगती ही त्या नेत्याच्या कार्यावर अवलंबून राहते.

नेत्याला यशस्वी होण्यासाठी विविध गुणांची आवश्यकता असते. त्याप्रमाणे विविध कार्य करावे लागते. यशस्वी नेता होण्यासाठी आपल्या कार्याविषयी जागृत असावे लागते तसे असेल तर नेतृत्व करण्यास यशस्वी ठरतो. नेत्याचे अस्तित्व हे गुणापेक्षा कार्यावर अवलंबून असते. नेता परिस्थितीचे समुहाचे नेतृत्व करतो. त्या परिस्थितीच्या आणि समुहाच्या मुलभूत प्रश्न सोडविण्यासाठी त्याला विविध कार्य करावे लागतात. नेत्याला वेगवेगळ्या प्रसंगी वेगवेगळ्या समुहाचे समस्या लक्षात घेऊन कार्य करावे लागतात. त्याचे कार्य ही सार्वत्रिक स्वरुपाचे असतात. त्यामुळे त्याला ~~काळ~~ काळ, स्थळ लक्षात घेऊन कार्य करावे लागतात, म्हणजेच नेत्याचे कार्य हे व्यक्ती समुह व परिस्थितीयावर अवलंबून असते. असे असले तरी नेत्याला खालील प्रमुख कार्य करावे लागतात.

(1) **प्रशासनात्मक कार्य :-** यशस्वी नेत्याला प्रथम स्थानीत प्रशासकीय स्वरुपाचे कार्य करावे लागते. नेता हा समाजाचा एक ~~कुशल~~ प्रशासक असतो. त्यामुळे त्याला समाजातील सर्व कामाचे नियोजन करावे लागते कामाची विभागणी करुन योग्य व्यक्तीला योग्य काम देणे अनुयायांना दिलेले काम निट निर करतात का नाही यावर देखरेख करणे. इत्यादी प्रशासकीय कार्य त्याला करावे लागतात. कामात चुका होत असतील तर त्या चुका संबंधीतांच्या निदर्शनास आणून देणे व त्या चुकांच्या दुरुस्ती साठी नेता हा कुशल प्रशा' मार्गदर्शन करणे इत्यादी कार्य नेत्याला करावे लागतात. नेता हा कुशल प्रशासक असतो. आणि तो तसा असला पाहिजे कुशल प्रशासक या नात्याने नेत्याला आपल्या सहीदाराला आपल्या

आपल्या कार्यक्रमात आणि समाजात वेळोवेळी वेळ प्रसंगी
उपयुक्त मार्गदर्शन करावे लागते. योग्य कामासाठी योग्य व्यक्ती-
-ची निवड करावी लागते. आणि त्या व्यक्ती मध्ये काम
करण्याची इच्छा आहे का नाही याची सुद्धा तपासणी करावी
लागते. अनुयायांमध्ये वाद निर्माण झाल्यास मध्यस्थी करून
वाद मिटवावे लागतात. अनुयायांतील व समाजातील वादांत
निःपक्षपाती पणे निर्णय दिला पाहिजे. इत्यादी कार्य प्रशासकाच्या
नात्याने नेत्याला करावे लागते.

★ योजना व धोरणे आखणे

→ नेत्याचे समाजातील दुसरे महत्त्वाचे
कार्य म्हणजे समाजाच्या आणि राष्ट्राच्या विकासासाठी विविध
योजना तयार करावी लागतात. समाज व राष्ट्राची उद्दीष्टे
डोळ्यांसमोर ठेवून त्यांच्या योजना तयार कराव्या लागतात.
तयार केलेल्या योजना अमलात आणण्यासाठी विविध कार्यांची
जुळवा-जुळव ही कार्य नेत्याची आहेत. नेत्याला समाजासाठी
दोन प्रकारच्या योजना कराव्या लागतात.

(A) तात्कालीन योजना

→ प्रत्येक समाजात वेळ प्रसंगी काही
घटना उद्भवतात.
उदा :- भूकंप नैसर्गिक संकट इत्यादी या वेळी या संकटा-
-तून समाजाला वाचवण्यासाठी समाजाला मदत
करावी लागते. या पद्धतीसाठी नेत्याला तात्कालिक योजना
आखावी लागते. जर तात्कालीन योजना आखली नसेल तर
त्या परिस्थिती समोर जावे लागेल.

(B) दिर्घकालीन योजना :-

→ तात्कालीन योजने बरोबरच समाजा-
साठी या योजना तयार कराव्या लागतात. समाजाच्या व व्यक्ती-
-च्या सर्वांगीण विकासासाठी समाजाचे मुलभूत प्रश्न नेहमीसाठी
सोडविणे आवश्यक आहे. असते. ते प्रश्न सोडविण्यासाठी
नेत्याला दिर्घकालीन योजना तयार कराव्या लागतात जर
समाजाचे मुलभूत प्रश्न जर समाजाकडून यशस्वीरीत्या

सोडविले जात असेल तर त्यांची समस्या समाज मान्य करते. म्हणून नेत्यांची तात्काळ गरज, मदत, करण्यासाठी व जीवनाचे मूलभूत प्रश्न सोडविण्यासाठी दोन्ही प्रकारच्या समस्या आमलात आणाव्या लागतात.

(c) धोरण निश्चीत करणे :-

नेत्याचे तिसरे महत्वाचे कार्य म्हणजे धोरण निश्चीत करणे होय, नेत्याला समाजासाठी व राष्ट्रासाठी निश्चित धोरणे ठरवावी लागतात. नेत्याचे हे अतिशय महत्वाचे कार्य आहे. कारण कोणत्याही समाजाचे, आदर्श ध्येय आणि धोरणे निश्चीत करणे आवश्यक असतेच पण अवघड काम आहे. धोरण ठरवणे हे नेत्याला यासाठी आवश्यक असते, की त्या धोरणामुळे समाजाची राष्ट्राची प्रगती त्यावर अवलंबून असते. धोरण ठरवित असताना नेत्याला एका बाजूने परिस्थितीकडे लक्ष द्यावे लागते (त्याला सल्ला घ्यावा लागतो) तर दुसरीकडे आपल्या अनुयांयांना आणि समाजाला विश्वासात घ्यावे लागते. यामुळेच धोरण ठरविणे अवघड आहे. कोणत्याही नेत्याला केवळ धोरण ठरवून चालत नाही, तर त्या धोरणाच्या बाजूने अनुकूल लोकमत तयार करायचे कार्य देखील करावे लागते. धोरण निश्चित केल्यानंतर त्या संबंधी अनुकूल किंवा प्रतिकूल प्रतिक्रिया निर्माण होत असतात. निश्चीत केलेल्या धोरण विषयी वेगवेगळ्या सूचना मांडल्या जातात. वेगवेगळ्या विचार प्रतिपादित केल्या जातात, या सर्वांचा विचार करून धोरणामध्ये फेर बदल स्वतःहा करावा लागतो. नेत्याला केवळ धोरण निश्चित करण्याचे कार्य करून भागत नाही तर त्याला धोरणा अंमलबजावणी करण्याचेही कार्य करावे लागते. नेत्याने अचूक धोरण निश्चीत केल्यास समाजाचा व राष्ट्राचा विकास होऊ शकतो. नेत्याला योग्य धोरणामुळे समाजाला उद्दिष्ट पूर्तीसाठी वाटचाल करता येते. नेता त्याप्रमाणे धोरण आखतो. त्याच प्रमाणे समाजाचा आदर्श होत असतो. भारताचे पहिले पंतप्रधान यांनी

अलिप्तता, शांततामय, सहजीवन या परराष्ट्रीय तत्वांचा अवलंबकरून आंतर राष्ट्रीय क्षेत्रात भारताला उज्वल यश संपादन करून दिले आहे.

(5) विशेषज्ञ :- नेत्याला समाजातील एक विशिष्ट तज्ञ म्हणून कार्य करावे लागते. हे कार्य अतिशय जबाबदारीने चिकित्सकपणे करावे लागते. नेता जर तज्ञ असेल तर त्या नेत्याची आखलेली धोरणे [illegible] समाजा- मध्ये एक प्रकारचे आदर निर्माण करतात. समाजाचा विकास करण्यासाठी कोणत्याकडे तज्ञता असावी लागते. समाजाच्या राष्ट्राच्या समस्या आणि अडचणी सोडविण्यासाठी तो तज्ञ असला पाहिजे म्हणूनच त्याला समाजातील एक तज्ञ म्हणून कार्य करावे लागते.

(6) तत्वज्ञ किंवा विचारवंत :- नेत्याला समाजामध्ये विचारवंत म्हणून कार्य पार पाडावे लागते. नेता हा त्या समाजाचे आदर्श ध्येयाचे चालते बोलते उदाहरण असतो. नेता हा त्या समाजाला विवेकी स्वरूपाचे विचार देत असतो. त्याप्रमाणे तो समाजाला प्रेरणा व मार्गदर्शन करण्या- -चे काम करतो. म्हणूनच नेत्याचे विचार याचे अनुकरण समाज व अनुयायी असते. कारण नेता हा समाजाला प्रेरणा आणि वस्तुनिष्ठ विचार देण्याचे कार्य करतो.

(7) समूहाचे प्रतीक :- एका अर्थाने तो समाजाचे प्रतीक असतो. नेत्याच्या विचारावरून व कार्यावरून आपल्याला त्या समाजाचे स्वभाव व गुणदोष समजू शकतात. प्रत्येक समाजाचे खास असे वैशिष्ट्ये असते. प्रत्येक समाजाची एक परंपरा, रूढी, संस्कृती, कला, साहित्य इत्यादीचे संरक्षण करण्याचे काम नेत्याला करावे लागते. या वैशिष्ट्यांचे संरक्षण केल्यामुळे समाजात ऐक्य प्रस्थापित करणे हे नेत्याला शक्य होते. म्हणून समाजाचे प्रतीक म्हणून कार्य

करत असताना समाजातील विविध घटकांकडे त्याने पूर्ण लक्ष द्यावे लागते.

(८) मार्गदर्शक म्हणून कार्य करणे :- नेता हा समाजाचा मार्गदर्शक असतो. त्यामुळेच समूहाला मार्गदर्शन करण्याचे अतिशय महत्त्वाचे कार्य नेत्याला करावे लागते. नेता आपल्या अनुभवाच्या शहाणपणाच्या साहाय्याने संकट प्रसंगी अचूक मार्गदर्शन करू शकतो. नेत्याच्या मार्गदर्शनामुळे अनुयायांमध्ये चैतन्य व स्फूर्ती निर्माण होते. व समाजातील व्यक्ती कार्य प्रवृत्त होते. नेत्याच्या मार्गदर्शनाने हे समाजाला प्रगतीकडे घेऊन जाते. म्हणून नेत्याला मार्गदर्शक म्हणून कार्य करत असताना योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी योग्य व्यक्ती निवडावी लागते.

(९) आंतरिक संबंधावर नियंत्रण ठेवण्याचे कार्य :- समाजावर, समाजातील व्यक्ती व्यक्तींतील संबंधावर नियंत्रण ठेवण्याचे कार्य नेत्याला करावे लागते. आपले अनुयायी व समाजातील इतर अन्य घटक यांच्या व्यवहारावर त्याला सतत नजर ठेवावी लागते. समाज आणि समाज सदस्यांवर नियंत्रण ठेवताना समाजातील सदस्यांमध्ये परस्परांशी प्रेम सहकार्य करावे. बंधुभावना सदस्यांमध्ये निर्माण करण्याचे कार्य करावे लागते. त्याच्या या कार्यामुळे समाजात ऐक्य निर्माण होते.

(१०) बक्षीस देणे व शिक्षा करणे :- नेत्याला समाजात संतुलन ठेवण्याचे कार्य करावे लागते. हे संतुलन ठेवण्यासाठी समाजातील चांगल्या व्यक्तींना चांगल्या

कामाला बक्षीस पारितोषिक द्यावे लागते. व्यक्तीला प्रोत्साहन किंवा बक्षीस दिल्यास समाजातील अन्य व्यक्ती देखील समाजाच्या हिताचे कार्य करण्यास प्रवृत्त होतील बक्षीसामुळे चांगले काम करणाऱ्या व्यक्ती देखील समाधान होते. गौरव करणे, व त्यांना प्रोत्साहित करणे, त्यांना पारितोषिक देणे हे कार्य नेत्याला करावे लागते. समाजामध्ये चांगले काम करणाऱ्या व्यक्ती प्रमाणे वाईट काम करणारे व्यक्ती देखील असतात, या वाईट काम करणाऱ्या व्यक्तीवर नियंत्रण ठेवणे त्याला त्याच्या वाईट कामा बद्दल शिक्षा करणे हे नेत्याचे कार्य असते.

(११) संयोजक म्हणून कार्य :-

नेता हा कुशल संयोजक असला पाहिजे कारण त्याला समाजातील विविध गटांचे व अन्य इतर गोष्टींचे संयोजन करावे लागते. समाजाच्या गरजा व गरजांच्या पूर्ततेसाठी उपलब्ध असणारी विविध साधने त्यांना संयोजन करावे लागते. देशाने व पक्षाने निर्धारित यांच्यात कार्यक्रम मूर्त स्वरूपात आणण्यासाठी त्याची प्रत्येक अंमलबजावणी करण्यासाठी नेत्याला विविध संयोजन करावे लागते. नेत्याला देशातील विविध भागाच्या विकास करण्यासाठी नियोजन आणि संयोजन करण्याचे कार्य करावे लागते.

(१२) आदर्श निर्मितीचे कार्य

(१३) समाजाचा घटक म्हणून कार्य करणे

(१४) समूहाचा प्रतिनिधी